


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३०८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१९ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# ठाकरेंची सेना पुन्हा फुटली!

## मोदी सरकारकडून टार्गेट सेट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, नवी दिल्ली :** आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस पाठोपाठ शिवसेना उबाठाचे खासदार फुटले आहेत. लोकसभेत ठाकरेंचे ९ खासदार आहेत. ऑपरेशन टायगर लक्षात घेता उद्धव ठाकरेंकडून सर्व खासदारांची बैठक बोलावण्यात आली होती. बैठकीला ९ पैकी केवळ ३ खासदार उपस्थित राहिले. त्यामुळे ठाकरेंची अडचण वाढली आहे. गेल्या ३ महिन्यांत ३ पक्षांचे खासदार फुटले आहेत.



१७ एप्रिल २०२६ रोजी मोदी सरकारकडून महिला आरक्षण सुधारणा विधेयक लोकसभेत मांडण्यात आलं. त्या आडून मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करण्याचा भाजपचा प्रयत्न होता. पण इंडिया आघाडीनं एकत्र राहून विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. घटना दुरुस्ती विधेयक असल्यानं विधेयकाच्या बाजूनं दोन तृतीयांश मतदान गरजेचं होतं. विधेयकाच्या बाजूनं २९८ मतं पडली, तर २३० मतं विरोधात गेली.

लोकसभेत विशेष बहुमत (दोन तृतीयांश) मिळवणं एक मोठी प्रक्रिया आहे. पण एनडीए दोन तृतीतांश बहुमताच्या जवळ आहे. लोकसभेत एनडीएचं संख्याबळ ३१४ वर पोहोचलं आहे. तृणमूलचे २० खासदार फुटल्यानं एनडीएचा आकडा ३०० च्या पुढे गेला. आता ६ खासदारांनी ठाकरेंची साथ सोडल्यानं हाच आकडा ३२० वर पोहोचला आहे.

**लोकसभेत काय आकडेवारी?**

लोकसभेत ५४३ जागा आहेत. त्यामुळे दोन तृतीयांश बहुमतासाठी ३६२ चा आकडा आहे. तीन जागा रिक्त असल्यानं बहुमताचा आकडा ३६० वर येतो. १७ एप्रिल २०२६ रोजी मतदान झालं, तेव्हा १२ खासदार अनुपस्थित राहिले. त्या दिवशी ५२८ खासदार हजर होते. त्यांनी मतदान केलं. तेव्हा दोन तृतीयांश मतदानासाठी ३५२ चा आकडा गरजेचा होता. पण सत्ताधाऱ्यांना २९८ मतं मिळवता आली. म्हणजेच ५४ मतं कमी पडली.

१७ एप्रिलची परिस्थिती पुन्हा निर्माण झाल्यास आता एनडीएकडे २६ अधिकची मतं असतील. तृणमूलचे २० आणि ठाकरेंचे ६ खासदार आता सरकारच्या बाजूनं मतदान करतील. १७ एप्रिलला एनडीएला ५४ मतं कमी पडली होती. त्यापैकी २६ मतांची सोय झालेली आहे. पण तरीही २८ खासदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. अशा स्थितीत मोदी सरकारचं लक्ष तमिळनाडूतील एम. के. स्टॅलिन यांच्या द्रमुककडे लागून आहे. या पक्षानं इंडिया आघाडीची साथ सोडलेली आहे.

एनडीएच्या गोटातील वरिष्ठ नेते सध्या द्रमुकच्या नेत्यांशी संवाद साधत आहेत. तमिळनाडूतील विधानसभा निवडणूक निकालानंतर काँग्रेसनं द्रमुकची साथ सोडल्यानं द्रमुक नाराज आहे. याच कारणामुळे त्यांनी इंडिया आघाडीची साथ सोडली. द्रमुकचे लोकसभेत २२ खासदार आहेत. ते जर एनडीएच्या बाजूनं उभे राहिले तर दोन तृतीयांश बहुमताच्या आकड्याच्या अगदी जवळ जाता येईल. बहुमतापासून एनडीए अवघ्या ६ जागा दूर असेल. अशा स्थितीत इंडिया आघाडीतील लहान पक्षांना आपल्या बाजूनं वळवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. या परिस्थितीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिकादेखील महत्त्वाची ठरते. त्यांच्याकडे ८ खासदार आहेत.

**राज्यसभेतील बलाबल काय?**

दुसरीकडे राज्यसभेत बहुमताचं गणित जुळवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. राज्यसभेची सदस्य संख्या २४५ आहे. दोन तृतीयांश बहुमतासाठी १६४ खासदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. तृणमूलच्या तिघांनी राजीनामे दिले आहेत. त्यामुळे बहुमताचा आकडा १६२ होतो. सध्याच्या घडीला एनडीएकडे १५० खासदार आहे. इथेही द्रमुकनं साथ दिल्यास एनडीए बहुमताजवळ पोहोचते. द्रमुककडे ८ खासदार आहेत. द्रमुकच्या खासदारांसह एनडीएचा आकडा १५८ वर जातो. म्हणजेच बहुमतासाठी केवळ आणखी ४ खासदारांची सोय करावी लागेल.

# शेतकऱ्यांच्या त्यागाला न्याय मिळालाच पाहिजे !

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१८, चंद्रपूर :** कोळसा उत्खननासाठी आपली सुपीक जमीन गमावणाऱ्या शेतकरी कुटुंबांच्या वेदना आणि भविष्यातील असुरक्षितता लक्षात घेऊन राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेत वेकोलीमार्फत अधिग्रहित होणाऱ्या शेतजमिनीला प्रति एकर किमान ३० लाख रुपये मोबदला देण्याची ठाम मागणी केली. जमीन ही शेतकऱ्याची केवळ मालमत्ता नसून त्याच्या कुटुंबाचा आधार, उपजीविकेचे साधन आणि पुढील पिढ्यांचे भविष्य असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतजमिनीसाठी दिलेल्या त्यागाला न्याय देणे ही शासनाची जबाबदारी असल्याची भूमिका आ.मुनगंटीवार यांनी यावेळी मांडली. या मागणीची तात्काळ दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी यासंदर्भातील मुख्य सचिवाला प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याचे निर्देश दिले आहेत.

वेकोली मार्फत राज्यातील विविध भागांमध्ये कोळसा उत्खननासाठी मोठ्या प्रमाणावर शेतजमिनीचे अधिग्रहण करण्यात येते. जमीन गेल्यानंतर अनेक शेतकरी कुटुंबे भूमिहीन होतात. दोन एकर जमिनीमागे कुटुंबातील केवळ एका सदस्याला नोकरी मिळते, तर उर्वरित सदस्यांच्या रोजगाराचा प्रश्न कायम राहतो. याशिवाय उत्खननामुळे शेती, जलस्रोत आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणामही स्थानिकांना सहन करावे लागतात. दि. २५ मे २०१२ च्या शासन निर्णयानुसार वेकोलीकडून पडीत जमिनीसाठी ६ लाख, कोरडवाहू जमिनीसाठी ८ लाख आणि ओलीत जमिनीसाठी १० लाख रुपये मोबदला देण्यात येत होता. मात्र गेल्या १३ वर्षांत महागाई, जमिनींचे बाजारभाव, पुनर्वसनाचा खर्च आणि जीवनावश्यक गरजांमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे सध्याचा मोबदला शेतकऱ्यांना न्याय देणारा नसल्याचे आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

या मागणीची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी संबंधित सचिवांना हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याचे निर्देश दिले आहेत. शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला मिळावा आणि त्यांच्या भविष्याची आर्थिक सुरक्षितता सुनिश्चित व्हावी, यासाठी शासन स्तरावर सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्याची जमीन म्हणजे केवळ मालमत्ता नव्हे, तर त्याचे अस्तित्व, उपजीविकेचा आधार आणि पुढील पिढ्यांचे भविष्य असते. देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठी जेव्हा एखादा शेतकरी आपली जमीन देतो, तेव्हा तो केवळ मातीचा तुकडा गमावत नाही, तर आपल्या कुटुंबाची आर्थिक सुरक्षितताही पणाला लावतो. त्यामुळे विकासाच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या या शेतकऱ्यांच्या त्यागाला न्याय मिळणे अत्यावश्यक आहे,अशी भावना आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

# २८ जून ला चंद्रपुरात बहुजन समाजाचा महामोर्चा...

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** राष्ट्रीय ओबीसी महासंघ, विजा- भज, विमाप्र, अनुसूचित जाती/जमाती सर्व समाज संघटने तर्फे दिनांक २८ जून ला ओबीसी समाजाची जातिनिहाय जनगणना करावी आणि १४ मे २०२६ महाराष्ट्र सरकारने आरक्षित वर्गासाठी काढलेला कॅबिनेट निर्णय रद्द करण्यात यावा. केंद्र सरकारने अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसोबतच ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचे ३० एप्रिल २०२५ ला केंद्र सरकारने कॅबिनेट बैठक घेऊन निर्णय जाहीर केले होते. प्रत्यक्षात यासंदर्भात २२ जानेवारीला राजपत्र जारी केले, १ मे २०२६ पासून स्वघर गणना सुरुवात झाली आहे, ती १५ मे २०२६ पर्यंत होती. आणि प्रगणक द्वारे मकान सूचीकरण १६ मे पासून सुरवात झाली, जनगणनेसंबंधी ३३ प्रश्नावली जाहीर करण्यात आली आहे. बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचा स्पष्ट उल्लेख करतानाच इतरांसाठी अन्य शब्दाचा वापर करण्यात आला. मात्र, ओबीसींचा स्पष्ट उल्लेख टाळण्यात आल्याने जातनिहाय जनगणनेवरून प्रश्न निर्माण झाला आहे.

देशाच्या विकासात कुणाचे किती योगदान आहे हे जाणून घेण्यासाठी कुणाची संख्या किती आहे ही बाब समोर येणे आवश्यक आहे. त्यासाठी ओबीसींची जातनिहाय जनगणना




होणे आवश्यक आहे. ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये तर उर्वरित भागात फेब्रुवारी – मार्च २०२७ पासून प्रत्यक्ष जनगणना सुरू करण्यात येणार असल्याचे १६ जून २०२५ ला स्पष्ट करण्यात आले होते. नंतर रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त यांनी जनगणनेसंबंधी अधिसूचना २२ जानेवारीला जनगणना करण्यासाठी ३३ प्रश्नांची सूची तयार करून राजपत्रात समाविष्ट करण्यात आली. या सूचींमध्ये जनगणना घर क्रमांक, सामग्री, घराची स्थिती, कुटुंब क्रमांक, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव, त्याचे लिंग, विवाहित दाम्पत्यांची संख्या, घरातील खोल्यांची संख्या, पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्रोत, पेयजलाची उपलब्धता, वीज, शौचालय, रेडिओ, टीव्ही, इंटरनेट, लॅपटॉप किंवा कम्प्युटर, मोबाइल, कार, मुख्य धान्य अशा विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे. बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करण्यात आला. इतरांसाठी अन्य शब्दाचा प्रयोग करताना ओबीसींचा स्पष्ट उल्लेख टाळण्यात आला आहे.

राजपत्रातील बाराव्या सूचीत अनुसूचित जाती आणि जमातीच्या कुटुंबातील प्रमुखाचा उल्लेख करताना ओबीसीसाठी अन्य शब्द वापरण्यात आला आहे. ओबीसी समाजाचा स्पष्ट उल्लेख कुठेही करण्यात आला नाही. तसेच १२ डिसेंबर २०२५ ला सुद्धा कॅबिनेट निर्णय घेऊन जनगणने साठी अंदाजे ११,७१८,२४ कोटी रुपये निधी मंजूर केला त्यात आठव्या क्रमांकावर ३० एप्रिल २०२५ च्या कॅबिनेट निर्णयाचा उल्लेख असला तरी, खालच्या ओळीत पार्श्वभूमी मध्ये २०२७ ची जनगणना धर्म, अनुसूचित जाती/जमाती म्हणून उल्लेख आहे. तसेच आरक्षित गट साठी महाराष्ट्र सरकारने १४ मे २०२६ कॅबिनेट निर्णय घेतला आहे तो निर्णय ओबीसी, विजा, भज, अनुसूचित जाती- जमाती प्रवर्गातील स्पर्धा परीक्षा देत असलेल्या विद्यार्थ्यांना अत्यंत घातक असून या निर्णयामुळे बहुजन समाजातील विद्यार्थांना नुकसान करणारे आहे. म्हणून सर्व बहुजन समाजाने मिळून या महामोर्चाचे आयोजन केले आहे.

# खासदारांच्या बंडाविरोधात घाटकोपरात ठाकरे शिवसेनेचा आक्रोश...



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१८, घाटकोपर (मुंबई) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या सहा खासदारांनी पुकारलेल्या बंडाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात ठाकरे समर्थक शिवसैनिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. पक्षाच्या व्हीपचे उल्लंघन करून बैठकीला गैरहजर राहिलेल्या बंडखोर खासदारा विरोधात विविध शहरांमध्ये निषेध आंदोलन करण्यात येत असून,त्याचाच एक भाग म्हणून ईशान्य मुंबईतील घाटकोपर येथे गुरुवारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र आक्रोश आंदोलन करण्यात आले.

घाटकोपर पश्चिम येथील श्री सिद्धी गणेश मंदिर,भटवाडी येथे झालेल्या या आंदोलनात शिवसैनिकांनी बंडखोर खासदारांविरोधात काळे झेंडे दाखवत तीव्र निषेध व्यक्त केला. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत बंडखोरांविरोधात संताप व्यक्त केला. चले जाव... चले जाव... संजय पाटील चले जाव... अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

विभागप्रमुख सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.यावेळी घाटकोपर विधानसभा समन्वयक इम्रान शेख,विधानसभा प्रमुख सुभाष पवार,उपविभाग प्रमुख विलास पवार,शाखाप्रमुख संजय कदम,अजय भोसले, महाविकास आघाडीचे शरद कदम यांच्यासह महिला-पुरुष शिवसैनिक,युवासेना पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी जनतेने लोकशाही प्रक्रियेतून निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी पक्षशिस्त आणि मतदारांच्या विश्वासाचा सन्मान राखला पाहिजे,असे मत व्यक्त केले.जनादेशाशी प्रतारणा करणाऱ्या कृतींना शिवसैनिक कधीही समर्थन देणार नाहीत,अशी भूमिका त्यांनी मांडली.

शांततापूर्ण वातावरणात पार पडलेल्या या आंदोलनात बंडखोर खासदारांच्या भूमिकेचा तीव्र निषेध करण्यात आला.आगामी काळातही जनादेशाच्या संरक्षणासाठी आणि पक्षनिष्ठा कायम ठेवण्यासाठी अशाच प्रकारची आंदोलने सुरू ठेवण्याचा निर्धार शिवसैनिकांनी व्यक्त केला.

# पावसाअभावी खरीप पेरणीचे नियोजन कोलमडले ; पारनेरचा शेतकरी चिंताक्रांत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** जून महिन्याचा दुसरा आठवडा संपत आला असूनही अद्याप दमदार पावसाची सुरुवात झाली नाही. पावसाचा एकही थेंब न पडल्याने शेतकर्यांची चिंता वाढली आहे. दररोज सकाळपासून दुपारपर्यंत आकाशात ढगांची गर्दी होत असली तरी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणार्या जोरदार वार्यांमुळे हे ढग विरून जात आहेत. परिणामी आभाळ पुन्हा स्वच्छ होत असून ४० ते ४२ अंश सेल्सिअस तापमानाचा उष्मा कायम आहे. या परिस्थितीमुळे दुष्काळसदृश परिस्थितीची चाहूल लागल्याने खरीप हंगामाचे नियोजन कोलमडण्याची चिन्हे दिसत असल्याने शेतकरी चिंताक्रांत झाले आहेत.

मागील वर्षी मे महिन्यात रोहिणी नक्षत्राचा चांगला पाऊस झाला होता. त्या पावसाच्या आधारे बाजरी,सोयाबीन ,मूग पेरणीला सुरुवात झाली होती. त्यानंतर जूनच्या पहिल्या



आठवड्यात मृग नक्षत्रानेही हजेरी लावली होती. मात्र यंदा परिस्थिती पूर्णतः उलट आहे. मे महिन्याच्या अखेरीस काही भागांत अवकाळी स्वरूपाचा किरकोळ पाऊस झाला; परंतु त्यातही पावसापेक्षा वादळाचा प्रभाव अधिक होता. हवामान विभागाने यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली होती. दरम्यान, धरणांतील जलसाठा घटला असून विहिरी व कूपनलिकांनीही तळ गाठला आहे. त्यामुळे लवकरच दमदार पाऊस न झाल्यास भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. खरीप हंगामासाठी शेतकर्यांनी मोठ्या मेहनतीने शेतजमिनीची मशागत करून ठेवली आहे.

पठारी भागातील जिरायती क्षेत्रात नांगरणी, वखरणी व कुळवाच्या पाळ्या घालून मटकी, उडीद, हुलगे, बाजरी, भुईमूग, मका आदी पिकांसाठी जमीन तयार करण्यात आली आहे. मात्र पावसाअभावी पेरण्या रखडल्या असून शेतकर्यांच्या नजरा आता आकाशाकडे लागल्या आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकऱ्यांनी बी - बियाणे व रासायनिक खते खरेदी करून ठेवली आहेत. मात्र पावसाअभावी ही सामग्री घरातच पडून आहे. मागील वर्षी झालेल्या कर्जाची परतफेड करण्याच्या विवंचनेत असलेला शेतकरी राजा पाऊस पडावा म्हणून आकाशाकडे चातकाप्रमाणे वाट पाहत आहे. जून महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नाही.




## सीमाप्रश्न न ताणणे श्रेयस्कर

गेल्या काही दिवसांत भारत आणि नेपाळ यांच्यातील सीमावाद चर्चेत आला आहे. या वादाच्या निमित्ताने नेपाळचे तरुण आणि धडाडीचे पंतप्रधान बालेन शाह यांची काही विधाने बरीच वादग्रस्त ठरली. ते असे म्हणाले होते की, भारत आणि नेपाळ यांच्यातील सीमाप्रश्न सोडवण्यासाठी ब्रिटनने मध्यस्थी करायला हवी. 'पाश्चात्य देशांची मध्यस्थी' हा भारताच्या दृष्टीने फारच संवेदनशील मुद्दा आहे. १९५० आणि १९६० च्या दशकात अमेरिका आणि ब्रिटन यांनी काश्मीर प्रश्नावर मध्यस्थी करण्याच्या निमित्ताने सातत्याने पाकिस्तान धार्जिणी भूमिका घेतली होती. त्यामुळे १९७२ च्या सिमला करारापासून भारताने काश्मीर प्रश्नात कोणाचाही हस्तक्षेप नको अशी भूमिका घेतली.

गेल्या वर्षी देखील भारत-पाक संघर्ष थांबवण्यासाठी अमेरिकेने मध्यस्थी केली किंवा नाही याविषयी उलटसुलट चर्चा होत राहते. अमेरिका आणि अध्यक्ष ट्रम्प यांनी तो संघर्ष थांबवण्याचे श्रेय घेतले, हे भारताला अजिबात आवडले नाही. (पण त्यांनी खरोखर मध्यस्थी केली होती का हा प्रश्न अनिर्णितच राहिला.) त्यामुळे नेपाळच्या पंतप्रधानांनी ब्रिटनच्या मध्यस्थीचा मुद्दा मांडताच त्यावर आश्चर्य, खेद, आणि काही प्रमाणात राग अशा प्रतिक्रिया उमटल्या. त्यामुळे नेपाळने अशी सारवासारव केली की ब्रिटनकडे या वादाच्या संदर्भातील काही जुनी कागदपत्रे असतील तर ती नेपाळला हवी आहेत. त्याशिवाय बालेन शाह असेही म्हणाले होते, की दोन्ही देशांनी एकमेकांच्या प्रदेशांवर अतिक्रमण केलेले आहे. हेही वादग्रस्त विधान आहे.

भारताने नेपाळचा कोणता प्रदेश खरेच बळकावला आहे? नेपाळने भारताचा कोणता प्रदेश बळकावला आहे? हे कधीपासून झाले आहे? सरकारांनी याची कल्पना का दिली नाही? गमावलेला प्रदेश परत घेण्यासाठी काय पावले उचलली गेली? जर असे काहीच नसेल तर नेपाळच्या पंतप्रधानांनी चुकीचे विधान का केले? की असे मुद्दाम म्हणून ते भारत-नेपाळ सीमा 'जैसे थे' ठेवून, सीमावादावर काही मार्ग काढण्यासाठी पार्श्वभूमी तयार करत आहेत? असे अनेक प्रश्न बालेन शाह यांच्या विधानांमुळे समोर येतात. भारताच्या दृष्टीने पाहता, २०१९ आणि २०२० मध्ये सहा महिन्यांच्या अंतराने दोन रस्ते पूर्ण होणे आणि दोन देशांबरोबर सीमेचे प्रश्न उफाळून येणे असे घडले. या दोन्ही रस्त्यांचे देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्व आहे. ऑक्टोबर २०१९ मध्ये पूर्व लडाखमध्ये भारताने दारबुक-श्योक-दौलत बेग ओल्डी रस्त्यावरील एका पुलाचे काम पूर्ण केले. या पुलामुळे उत्तर सीमेवरील अतिशय महत्त्वाच्या काराकोरम खिंडीजवळ असणाऱ्या लष्करी तळांना रस्त्याने बारमाही जोडणे शक्य झाले. हा रस्ता 'डीएस-डीबीओ रोड' या नावाने ओळखला जातो आणि भारत-चीन सीमेच्या अगदी जवळून हा रस्ता जातो. या रस्त्याचे काम पूर्ण होणे आणि भारत व चीन यांच्यात पूर्व लडाखमध्ये संघर्ष उफाळून येणे याचा थेट परस्परसंबंध आहे. या रस्त्यामुळे लडाखमधील चिनी लष्करी वर्चस्वाला आव्हान देता येणे शक्य आहे. या प्रदेशावरील भारताचे नियंत्रण अधिक घट्ट झाले आहे. त्यानंतर पाचच महिन्यांनी, मार्च २०२० मध्ये, भारताने ८० किमी लांबीचा लिपुलेख रस्ता पूर्ण केला. या रस्त्यामुळे दिल्ली आणि तिबेटमधील कैलास-मानसरोवर यांच्यातील अंतर खूपच कमी झाले; तसेच भारत आणि चीन यांच्यातील व्यापाराच्या दृष्टीनेही हा रस्ता उपयुक्त आहे. लिपुलेख हा प्रदेश भारत-चीन-नेपाळ या तीन देशांच्या सीमा एकत्र येतात अशा मोक्याच्या जागी वसलेला आहे. या रस्त्याचे उद्घाटन झाले आणि नेपाळमध्ये आंदोलने सुरू झाली. भारताने नेपाळी प्रदेशावर अतिक्रमण केले आहे, असे अनेकांना वाटले. तेव्हापासून, लिपुलेख-कालापानी नावाने ओळखला जाणारा हा प्रश्न, गेली सहा वर्षे, भारत-नेपाळ संबंधांच्या केंद्रस्थानी आहे. लिपुलेख-कालापानी मुद्दा २०२० मध्ये खूपच तापला. यामागे चीनचा हात होता असेही सांगितले जाते. २०२० मध्ये भारत आणि चीन यांच्यात लडाखमध्ये तणाव होता. भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणाला सर्वांत मोठे आव्हान चीनच्या स्वरूपात उभे राहिले होते; तसेच सारे जग कोविडच्या संकटाचा मुकाबला करत होते. देशाच्या स्तरावर आरोग्याचे प्रश्न, संरक्षणाची आव्हाने, आणि खालावत जाणारी आर्थिक स्थिती असे चित्र होते. अशा आव्हानात्मक काळात नेपाळसारखा मित्र देश विरोधात जाणे हा भारताच्या दृष्टीने मोठा धक्का होता. नेपाळच्या संसदेमध्ये लिपुलेख-कालापानी मुद्दा उचलला गेला. संसदेने नव्या नकाशाला मान्यता देणारी घटना दुरुस्ती एकमताने मंजूर केली. इथे 'एकमताने' हा मुद्दा खूपच महत्त्वाचा आहे. नेपाळच्या तेव्हाच्या राजकारणात पक्षीय स्तरावर असे एकमत होणे खूपच कठीण होते. तरीही देशाच्या सीमेचा मुद्दा आल्याने राजकीय मतभेद बाजूला ठेवले गेले. अशा एकमतामुळे सीमाप्रश्न सुटणे आणखी कठीण होऊन बसते. त्या देशातील कोणत्याही विरोधी पक्षाने नेपाळच्या सरकारला प्रभावीपणे जाब विचारण्याचे आणि या मुद्द्यावर विरोध करण्याचे आपले काम चोख बजावले नाही, असेच म्हणावे लागेल. तसेच देशाच्या सार्वभौमत्वाचे प्रश्न आले की प्रश्न तुटेपर्यंत ताणला जातो व वाटाघाटींना फार अर्थ राहत नाही हे आंतरराष्ट्रीय राजकारणातले साधेच सत्य नेपाळबाबत पाहायला मिळाले. नेपाळने पुढे जात आपल्या देशाच्या नोटांवर हा नवा नकाशा छापला. लिपुलेख-कालापानी मुद्दा हा नेपाळचे तत्कालीन पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्या राजकारणासाठी उपयुक्त होता. त्यांनी देशात भारतविरोधी राजकारण करून आणि राष्ट्रवादाची भाषा वापरत स्वतःचे पद सुरक्षित ठेवले. या सीमावादाला भावनेचा मुलामा देत आपली राजकीय पोळी त्यांनी भाजून घेतली.

# 'साठी' तील 'शिवसेना'



१९६० साली शिवाजी पार्क येथील सभेत मध्ये बोलतांना प्रबोधनकार ठाकरे यांनी 'हा बाळ मी आज तुम्हाला दिला आहे 'आणि राज्याला मिळाले ते हिंदूहृदय सम्राट कै.बाळासाहेब.याच बाळासाहेबांनी मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, परप्रांतीयाकडुन होणाऱ्या कोंडीला उत्तर देण्यासाठी बाळासाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून १९ जुन १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली. बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यपद्धतीमुळेच लाखो मराठी माणसें विशेषतः तरूणाई शिवसेने कडे आकर्षित झाली.

८०% समाजकारण आणि २०% राजकारण असे 'बाळकडू 'आपल्या सैनिकांना दिले आणि राज्यभर शिवसेनेच्या शाखांचा सामान्य माणसाला मोठा आधार वाटु लागला. कुठलीही जात-पात, धर्म, न पहाता असंख्य सामान्य कार्यकर्ते घडविले. अंबरनाथचे शाबीर शेख सारख्या मुस्लिम कार्यकर्ते कट्टर शिवसैनिक बनले. त्याचे बेधडक, बिनधास्त बोलणे ही एक 'ठाकरे' शैली म्हणून ओळखली जाऊ लागली, तर' शिवसेना स्टाईल 'ने आपला ठसा उमटविला. कट्टर हिंदूत्ववादी म्हणून शेवट पर्यंत आपल्या भुमिकेवर ठाम राहिले. शिवसेना ही संघटना आणि सामान्य जनतेला आधार वाटणारे लाखो शिवसैनिक हि बाळासाहेबांची महाराष्ट्राला मिळालेली मोठी देणगी आहे. सुरवातीच्या काळात शिवसेना मुंबई, ठाणे परिसरापुरती मर्यादित राहिलेल्या शिवसेनेने राज्यभर आपला विस्तार केला, तो केवळ कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यपद्धतीमुळेच. सुरवातीच्या काळात शिवसेनेची वाटचाल धिम्यागतीने सुरू होती. १९६७ साली शिवसेना निवडणुकीच्या रिंगणात ऊतरली आणि शिवसेनेच्या राजकीय प्रवासाला खऱ्याअर्थाने सुरवात झाली. वाघ हे शिवसेनेचे प्रतिक तर धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह. शिवसेनेच्या स्थापनेनंतर मुंबईत होणाऱ्या मराठी माणसाविरूद आवाज उठवित शिवसेनेने दाक्षिणात्य लोकांच्या विरूद्ध 'बजाओ पुंगी हटाओ लुंगी' अंदोलना हाती घेतले आणि खऱ्या अर्थाने मराठी माणूस जागा झाला आणि मोठ्या प्रमाणावर शिवसेनेकडे आकर्षित होत गेला. विशेषतः तरूणाईला बाळासाहेबांचे व्यक्तीमत्व भावले आणि जाती-धर्मा पलिकडे जाऊन तरुणाई शिवसेनेकडे वळू लागली. त्या काळात बाप काँग्रेस मध्ये तर मुलगा शिवसेनेत असे चित्र अनेक ठिकाणी दिसु लागले.

हळूहळू राज्याच्या ग्रामीण भागात देखील शिवसेनेची उपस्थिती असे चित्र निर्माण झाले होते. जवळपास चार ते पाच दशके कै. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेचे एकहाती नेतृत्व केले, कार्यकर्ते, नेते उभे केले, अनेकांना नगरसेवक, महापौर, आमदार, खासदार, मंत्री केले मात्र स्वतः कधीही सत्तेची लालसा बाळगली नाही, हे राजकीय श्रेत्रातील एकमेव उदाहरण असावे. शिवतीर्थावरील दर वर्षी होणारा दसरा मेळावा हा तर सर्वच शिवसैनिकांसाठी कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी स्फुर्ती मिळणारा सोनेरी क्षण ठरंत असे. राज्यभरातून लाखो शिवसैनिक, महिला, तरुण-तरुणी हे दसरा मेळाव्याला आवर्जून उपस्थित रहात. एकाच व्यासपीठावरून सुमारे चार दशके दरवर्षी लाखोंची सभा गाजविणाऱ्या या नेत्यांचा हा जागतिक विक्रम ठरावा. कै. बाळासाहेब ठाकरे यांचा शब्द म्हणजे आदेश मानुन आपले कर्तव्य पार पाडायचे असे लाखो निष्ठावान सैनिकांची फौज कै. बाळासाहेब ठाकरे यांनी उभी केली, याकाळात अनेक अडचणी देखील आल्या, भुजबळ यांच्या सारख्या नेत्याने शिवसेनेची साथ सोडली, तो नक्कीच बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेसाठी पहिला मोठा आघात होता. मात्र लाखो निष्ठावान शिवसैनिकांच्या साथीने शिवसेना पुन्हा उभी राहिली.त्यानंतरही अनेक वादळे आली मात्र शिवसैनिकांची मनोधैर्य त्यांनी कधीच खचु दिले नाही.राज ठाकरे, नारायण राणे यांनी वेगळी वाट धरली.

राजकीय नेत्यांमधे कितीही मतभेद असले तरी व्यक्तिगत जीवनात एकमेकांमधील शत्रुत्व असु नये हे तत्व त्यांनी तंतोतंत पाळले. दिलेल्या शब्दावर परिणामांची पर्वा न करता ठाम रहाणे, बेधडक भुमिका घेणे, प्रसंगी कोणाचाही मुलाहिजा न ठेवता आपल्या भुमिकेवर रहाणे, अशा त्यांच्या कार्यशैलीमुळे शिवसेनेने आपला हक्काचा मतदार तयार केला आहे. कधी काळी शिवसेनेला वसंत सेना संबोधले जात होते तर कधी त्यांनी आणिबाणीला समर्थन केले म्हणून त्यांच्यावर टीका झाली, तरीही शिवसेनेची आगेकूच त्यांच्या नेतृत्वाखाली होत राहिली. भारतीय विद्यार्थी सेना, कामगार सेना, महिला आघाडीच्या माध्यमातून शिवसेना तळागाळापर्यंत पोहचली १९९३ च्या दंगलीत मुंबई करांना मोठा आधार मिळाला तो शिवसेनेचाच हे मराठी मनाच्या कायम स्मरणात राहील. कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या नंतर ऊद्दव ठाकरे यांच्याकडे शिवसेनेचे नेतृत्व आले त्यांना संमिश्र यश लाभले, २०२२ साली शिवसेनेला मोठा धक्का बसला, त्यातुन सावरत असतांना नुकताच पुन्हा एक धक्का बसला आहे. शिवसेना हा एक विचार आहे आणि तो अनेकांच्या मनात रूजला आहे, विचारधारेवर असलेला कोणताही पक्ष संपत नाही कि विचार संपत नाही. कोणी कितीही दावे-प्रतिदावे केले तरी सामान्य शिवसैनिकांच्या मनात खरी शिवसेना ही ऊद्धव ठाकरे यांचीच मानतात.सर्व शक्तीमान महाशक्ती विरुद्ध लढाई सोपी नाही, कारण सर्व व्यवस्था, यंत्रणा यांच्या विरोधात लढता येत नाही त्यामुळेच साठ वर्षांच्या कालावधीत सध्याचा काळ हा शिवसेनेची आणि शिवसैनिकांची कसोटी पाहणारा काळ ठरणार आहे.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# रामललाच्या दानपेटीतील रक्कम चोरणाऱ्यांना शिक्षा तर होणारच !

जगभरातील कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या अयोध्यास्थित श्रीराम मंदिरातील दानपेटीत जमा होणाऱ्या रकमेत अपहार झाल्याच्या बातम्या मागील काही दिवसांपासून प्रसिद्ध होत आहेत. श्रीराम मंदिर ट्रस्टने श्रीराम मंदिरांसह संपूर्ण दर्शन मार्गात ४ डझन अर्पण पेट्या बसवल्या आहेत. या दानपेट्यांत जमा होणारी रक्कम मोजण्यासाठी ट्रस्टने एसबीआय बँकेला अधिकृत केले असून बँकेने एका खासगी एजन्सीला याचे कंत्राट दिले आहे. या एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी हा अपहार केल्याचे छुप्या पद्धतीने लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमधून लक्षात आले आहे.

अविनाश शुक्ल नावाच्या कर्मचाऱ्याने आणखी ४-५ कर्मचाऱ्यांच्या मदतीने हा अपहार केल्याचा संशय असल्याने त्यांची सखोल चौकशी करण्यात येत आहे. अविनाशने ५ लाख रुपये लंपास केल्याचे मान्य केले असून सदर रक्कम आपल्या खात्यातून काढून पुन्हा ट्रस्टच्या खात्यात जमा केली आहे. विरोधी पक्षांनी दानपेटीतील रक्कम चोरीला गेल्याचा आरोप केल्यानंतर या प्रकरणाचे विशेष अन्वेषण पथकाद्वारे अन्वेषण करण्याची मागणी श्रीराममंदिर तीर्थक्षेत्र न्यासाने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे केली. मुख्यमंत्र्यांनी अवघ्या काही तासांत पथकाची स्थापना केली आणि त्याच दिवशी लवकुश मिश्रा याला ताब्यात घेण्यात आले. अन्वेषण यंत्रणेला मिश्रा याच्या घरी १० लाख रुपये सापडले. त्याने काही पैसे कपाटात, तर काही पैसे शेणाच्या ढिगार्याखाली लपवले होते. या प्रकरणी आणखी एका कर्मचार्याचे अन्वेषण चालू असल्याचे समोर आले आहे. त्याच्याकडेही मिश्रा याच्याप्रमाणेच देणगीची रक्कम मोजण्याचे काम होते.

संशयित असलेल्या दोन्ही कर्मचार्यांना प्रत्येकी प्रति मास १८ ते २० हजार रुपये पगार दिला जातो; परंतु अलीकडच्या काही महिन्यांत त्यांच्या संपत्तीत अचानक वाढ झाल्याने अन्वेषण पथक या उत्पन्नाचा स्रोत शोधत आहेत. एका कर्मचार्याने जवळपास दीड कोटी रुपयांची जमीन खरेदी केली आहे, तर दुसर्याने ४० लाख रुपयांचे नवीन घर खरेदी केल्याचे आता समोर आले आहे. आतातर ५० हुन अधिक कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात आले असून गेल्या काही महिन्यांत ते अचानक करोडपती झाल्याने त्यांच्याही मालमत्तेची चौकशी करण्यात येणार आहे. प्राथमिक अंदाजात २०० कोटींचा अपहार झाल्याचे सांगण्यात येत असले तरी भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.



कर्मफळ न्यायानुसार केलेल्या प्रत्येक चांगल्या वाईट कर्माचे फळ आपल्याला मिळत असते. चुकिचे कर्म पाप रूपाने तर चांगले कर्म पुण्य रूपाने आपल्या संचितामध्ये जमा होते ज्याचे फळ आज नाहीतर उद्या प्रारब्धाच्या रूपाने मिळतेच मिळते. भगवंतावर श्रद्धा असणारा भक्त चराचरात भगवंत असल्याचा भाव ठेवून कर्म करतो. भगवंत सर्वत्र आहे आणि तो आपली प्रत्येक कृती पाहत आहे यावर त्याची नितांत श्रद्धा असते त्यामुळे कर्म करताना तो भगवंताला अपेक्षित असेच कर्म करतो. इथे तर साक्षात भगवंताच्या समोरच अपराध घडला आहे. याचे योग्य ते फळ चोरांना भविष्यात मिळेल यात शंका नाही. भक्ताने कष्टाने कमावलेले धन तो काही अंशी भगवंताच्या चरणी अर्पण करत असतो. अर्थात भगवंताला भक्ताच्या धनाची अपेक्षा नसली तरी भगवंताच्या कार्याला धनाची गरज भासतेच.

शिवाय भगवंताच्या चरणी भक्ताने निष्काम भावनेने धन अर्पण केल्याने तो त्याचा त्याग सुद्धा होतो. अध्यात्मात आणि साधनेत त्यागाला अनन्यसाधारण महत्व आहे. ज्याच्याकडे धन आहे त्याने भगवंताच्या चरणी धन अर्पण करावे, ज्याच्याकडे धन नाही त्याने ईश्वरी कार्यात अधिकाधिक सेवा करून तन अर्पण करावे. मनाने नामस्मरण करणे हा मनाचा त्याग झाला आणि ज्याच्याकडे तन, मन आणि धन सर्वकाही आहे त्याने ते यथायोग्य स्वेच्छेने अर्पण करावे. मंदिरात विराजमान रामल्ला ही केवळ मूर्ती नसून साक्षात प्रभू रामचंद्र या ठिकाणी वसले आहेत या भावाने देशभरातून भक्तगण अयोध्या नगरीत येत असतात. आपल्यातील सर्वकाही भगवंताला सांगत असतात, यथायोग्य दान दानपेटीत समर्पित करत असतात. आपल्या समोर साक्षात प्रभू श्रीरामचंद्र आहेत आणि आपल्या मनातील प्रत्येक गोष्ट ते ऐकत आहेत.

आपण दिलेले अर्पण प्रभूंच्या चरणी पोहोचत आहे ही त्यांची धारणा असते त्यामुळे दानपेटीत समर्पित होणारी रक्कम हे केवळ धन नसून त्याच्यामागे ते देणाऱ्याची अनन्वित श्रद्धा जोडलेली असते त्यामुळे त्या धनाचे रूपांतर अर्पणात झालेले असते. दानपेटीवर डल्ला मारणाऱ्या कर्मचाऱ्यांनी केवळ रक्कम लंपास केली नसून त्यांनी भक्तांच्या श्रद्धेचा भगवंताच्या दारातच अवमान केला आहे. मंदिरात जमा होणाऱ्या देवधनाचा हिशोब ठेवण्याचे दायित्व मंदिर ट्रस्टने एसबीआय बँकेला दिले आहे तर बँकेने त्याचे कंत्राट एका एजन्सीला दिले आहे. या एजन्सीचे कर्मचारी श्रीरामाचे भक्त आहेत का याची कोणतीही खात्री बँकेने नक्कीच केली नसावी.

भगवंताचा खरा भक्त एकवेळ आपल्या पदरचे धन देवकार्याला बहाल करेल मात्र देवधन लंपास करण्याचा विचारही त्याच्या मनाला शिवणार नाही. मंदिर ट्रस्टने एव्हढे मोठे दायित्व देताना या गोष्टीचा विचार का केला नाही. भगवंताच्या कार्यात धनाची कधी कमतरता भासत नाही. आज जितक्या धनाचा अपहार झाला त्याच्या कैक पटीने धन भगवंताच्या द्वारी जमा होईल मात्र ज्यांनी ज्यांनी आपले दायित्व विसरून चुकिचे कर्म केले त्याचा हिशोब आज ना उद्या नक्की होईल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

### ऑन लाईन

ऑन लाईन खरेदीची
आगळीअसते अकड
ऑर्डरफ्लेस करेफक्त
मुळीचं नसता निकड

बसल्या जागी उद्योग
कापला जातो बोकड
प्रत्येक गोष्ट हवी हवी
गळाठू जाईलं धाकड

रिप्लेस करायचे पुन्हा
घरात लावलीयं चवड
थकून जातो जीव बा
चालली सतत परवड

ओ टिपी देत बसायचे
घसा खरवडून ओरड
टोल फ्रीवर बोलताना
घशालालागली कोरड

स्वस्त स्वस्त म्हणतात
कसलीही करा निवड
लोभसवाणीजाहिरात
निर्माणकरणारं आवड

कार्डचेबील आल्यावर
अंगावर कोसळे दरड
इ एमआय लावून घ्या
वर्षभर कायमचेचिरड

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात फॉग कॅनन वाहनांचे उद्घाटन



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, पनवेल :** शहरातील वाढते वायू प्रदूषण आणि धूळकणांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पनवेल महानगर पालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत अत्याधुनिक फॉग कॅनन वाहनांचे बुधवारी महापौर नितीन पाटील, स्थायी समिती सदस्य परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल महानगरपालिकेच्या मागील छ.संभाजी महाराज मैदानात उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, महापालिका सदस्य अमर पाटील, विकास घरत, सरस्वती काथारा, सुमित झुंझारराव, अजय बहिरा, दशरथ म्हात्रे, उपायुक्त स्वरूप खारगे, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण उपस्थित होते.महानगरपालिकेने याआधी चार फॉग कॅनन वाहने नागरिकांच्या सेवेत दाखल केली आहेत. आता आणखी चार वाहने पालिकेने या मालिकेत सहभागी केली आहेत. यामुळे महापालिका कार्यक्षेत्रातील वायू प्रदूषण आणि धूळकणांवर नियंत्रण मिळवणे सोपे जाणार आहे. ही वाहने उच्च दाबाने सूक्ष्म पाण्याची फवारणी करून हवेत तरंगणारे धूळकण आणि प्रदूषणकारी घटक कमी करण्याचे कार्य करणार आहेत. वाढते शहरीकरण, बांधकामे आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता ही यंत्रणा प्रभावी ठरणार आहे. या फॉग कॅनन वाहनांमध्ये आधुनिक आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून, शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) सुधारण्यासाठी ती उपयुक्त ठरणार आहेत. विशेषतः खारघर, कळंबोली, कामोठे, पनवेल, खांदा कॉलनी, पनवेल परिसरातील मुख्य रस्ते आणि बांधकाम क्षेत्रांमध्ये या वाहनांचा वापर करण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे हवेतील सूक्ष्म धूळकणांचे प्रमाण कमी होऊन नागरिकांना अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि निरोगी वातावरण उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी व्यक्त केला आहे. शहराच्या पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## हणमंत शिंदे यांनी रयतेची सेवा प्रामाणिकपणे केली : प्राचार्य डॉ.चंद्रकांत खिलारे




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१८, खंडाळा (सातारा) :** श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ येथे रयत सेवक हणमंत शिंदे याच्या सेवापुर्ती निमित्त सत्कार व शुभेच्छा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलताना प्राचार्य खिलारे म्हणाले हनुमंत शिंदे यांनी आपली सेवा प्रामाणिकपणे आणि निष्ठेने केली. नवनवीन गोष्टी आत्मसात करत गोरगरीब विद्यार्थी- विद्यार्थीनीनां शिक्षणासाठी त्यांनी मदत केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन राजमाने होते. याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आप्पासाहेब देशमुख खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठान सचिव डॉ.विजय शिंदे, शिवसेना नेते प्रदीप माने,पंचायव समिती माजी सभापती मकरंद मोटे, उपप्राचार्य डॉ.सुभाष आहेर व त्यांच्या कुटुबियांनी आपल्या भावना व्यक्त केल्या त्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.यादव यांनी केले तर आभार प्रा.डॉ.सोनाली पवार यांनी मानले.

## उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांच्या हस्ते मराठा-कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१८, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील फरकंडा येथील लाभार्थ्यांना आज दि. १६ जून रोजी पालम तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तसेच तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना मराठा कुणबी प्रमाणपत्रे वाटप करण्यात आली. पूर्णा तालुक्यातील वंशावळ सिद्ध झाल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांना ही प्रमाणपत्रे मंजूर करण्यात आली. यामध्ये रितेश प्रसाद पौळ व मारोती एकनाथ पौळ यांना मराठा-कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी शासनाच्या निर्देशानुसार पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह प्रशासनाशी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमास उपस्थित नागरिकांनी प्रशासनाच्या या उपक्रमाचे स्वागत करून समाधान व्यक्त केले. यावेळी सिताराम गुरुजी पौळ, गोविंदराव पौळ, देविदास पौळ, रामेश्वर पौळ, शशिकांत पौळ यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तन प्रकरणातील आरोपीची आत्महत्या

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८ पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील वाणीपिंपळगाव येथील अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित आरोपीने आत्म हत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे मिळालेल्या माहितीनुसार, वाणीपिंपळगाव येथील एका साडेआठ वर्षीय मुलीसोबत गैरवर्तन झाल्याची तक्रार तिच्या आईने पालम पोलीस ठाण्यात दिली होती तक्रारीच्या आधारे पोलिसांनी भारतीय न्याय संहिता बीएनएस कलम ७४, ७५ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता.

या प्रकरणातील आरोपी असलेल्या ६२ वर्षीय व्यक्तीने गुन्हा दाखल झाल्यानंतर आत्महत्या केल्याचे समोर आले आहे पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, समाजात बदनामी होईल या भीतीतून आरोपीने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे मात्र आत्महत्येमागील नेमके कारण तपासानंतरच स्पष्ट होणार आहे दरम्यान, या प्रकरणी पालम पोलीस अधिक तपास करीत असून आत्महत्येच्या घटनेची स्वतंत्र नोंद करण्याची प्रक्रिया चालू आहे नोंद होताच सदरील घटनेची चौकशी सुरू करण्यात येणार असल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आले.

# अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाण्यांच्या साठ्यावर कृषी विभागाचा छापा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, मुल (चंद्रपूर) :** कृषी विभागाने एका गोपनीय माहितीच्या आधारे धडक कारवाई करत, विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवलेला संशयित अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाण्यांचा मोठा साठा जप्त केला आहे. या धडक कारवाईमुळे तालुक्यात बियाण्यांचा काळाबाजार आणि अनधिकृत विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, कृषी विभागाला कोकंबी येथील त्र्यंबक चुधरी यांचे नावे असलेल्या गोडावूनमध्ये संशयित आणि शासनाची मान्यता नसलेल्या एचटीबीटी कापूस बियाण्यांची बेकायदेशीर साठवणूक करुन ते शेतकऱ्यांना विकले जाणार असल्याची पक्की माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे जिल्हा भरारी पथकाने शासकीय पंचासमक्ष संबंधित ठिकाणी अचानक छापा टाकला. या छाप्यात १०७ पाकिटे संशयित अनधिकृत एचटीबीटी बियाणे जप्त करण्यात आले असून, त्याची बाजारपेठेतील किंमत अंदाजे ९७,८३० रुपये असल्याचे सांगण्यात आले. कृषी विभागाच्या पथकाने बियाण्यांचे नमूने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले असून, जप्त साठा पोलीस स्टेशन मुल येथे सुपूर्द करण्यात आला. पुढील कायदेशीर कारवाई व गुन्हा दाखल करण्यात आला.

कृषी विभागाचे आवाहन :

शेतकऱ्यांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता केवळ मान्यताप्राप्त आणि परवानाधारक कृषी केंद्रातूनच बियाण्यांची खरेदी करावी. खरेदी करतांना पक्के बील अवश्य घ्यावे. परिसरात कुठेही अनधिकृत किंवा प्रतिबंधित बियाणेयांची विक्री अथवा साठवणूक होत असल्याचे आढळल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, दोषींवर कडक कारवाई केली जाईल.

या मोहिमेत लकेश कटरे मोहीम अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर, श्रावण बोधे जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक, सुनील कारडवार तालुका कृषी अधिकारी मुल, मनोहर राजनहिरे बियाणे निरीक्षक तथा कृषी अधिकारी पंचायत समिती मुल, शुभम किरमिरवार बियाणे निरीक्षक तथा कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मुल, प्रकाश पराते प्रभारी मंडळ कृषी अधिकारी यांच्यासह पोलीस विभागाचे कर्मचारी सहभागी होते.

ही कारवाई कृषी विभागाच्या सुनील बोरकर, संचालक( निवगुनि) महाराष्ट्र राज्य, उमेश घाटगे विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर विभाग, प्रवीण देशमुख मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र राज्य, शंकर तोटावार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी चंद्रपूर, वीरेंद्र राजपूत कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर, चंद्रशेखर कोल्हे गुण नियंत्रण निरीक्षक तंत्र अधिकारी नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली. कृषी विभागाच्या या तत्पर कारवाईंचे परिसरातील शेतकऱ्यांकडून स्वागत होत आहे.

# पाटण तहसील कार्यालयात फार्मर आयडी सक्तीमुळे विद्यार्थी-पालक हैराण

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१८, पाटण :** शालेय प्रवेश, शिष्यवृत्ती, विविध शासकीय योजना तसेच शैक्षणिक कारणांसाठी आवश्यक असलेले उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला आणि इतर महसुली दाखले काढताना फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आल्याने विद्यार्थी व पालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची तक्रार समोर येत आहे. या संदर्भात राष्ट्रीय समाज पक्षाचे पाटण तालुकाध्यक्ष विकास संभाजी कदम यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

कदम यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या शाळा व महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू असून विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांची तातडीने आवश्यकता आहे. मात्र तहसील कार्यालयामार्फत ऑनलाइन दाखल्यांसाठी अर्ज करताना फार्मर आयडीची सक्ती करण्यात आल्याने अनेक विद्यार्थी व पालकांची तारांबळ उडत आहे. ग्रामीण भागातील अनेक नागरिकांकडे फार्मर आयडीची माहिती नसल्याने अथवा तो उपलब्ध नसल्याने दाखल्यांचे अर्ज प्रलंबित राहत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. याशिवाय दाखले काढण्यासाठी वापरण्यात येणारी ऑनलाइन यंत्रणा अनेकदा संथ गतीने चालते किंवा तांत्रिक अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत नवीन अट लागू केल्यामुळे नागरिकांच्या अडचणींमध्ये आणखी भर पडल्याचा आरोप करण्यात येत आहे.

तसेच विद्यार्थ्यांना जातीचा दाखला, रहिवासी दाखला अथवा इतर आवश्यक कागदपत्रांसाठी तलाठी कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याची तक्रारही समोर येत आहे. अनेक वेळा संबंधित अधिकारी कार्यालयात उपलब्ध नसल्याने नागरिकांचा वेळ आणि पैसा वाया जात असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.




शैक्षणिक प्रवेशाच्या महत्त्वाच्या काळात आवश्यक दाखले वेळेत मिळाले नाहीत तर विद्यार्थ्यांचे प्रवेश, शिष्यवृत्ती अर्ज आणि इतर शैक्षणिक प्रक्रिया अडचणीत येऊ शकतात. त्यामुळे फार्मर आयडी सक्तीबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि विद्यार्थ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, विद्यार्थी व पालकांना भेडसावणाऱ्या या समस्यांबाबत प्रशासन कोणती भूमिका घेते आणि दाखले वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मशागतीची कामे पूर्ण करून बळीराजाचे डोळे आभाळाकडे

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१८, पेण :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यासह पेण तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेती मशागतीची बहुतांश कामे पूर्ण केली असून आता बळीराजाचे डोळे पावसाकडे लागले आहेत. हवामान खात्याने यंदा मान्सूनचे आगमन लवकर होण्याचा अंदाज वर्तविल्यामुळे शेतकऱ्यांनीही वेळेआधीच नांगरणी, वखरणी, बांधबंदिस्ती, शेतसफाई आदी मशागतीची कामे पूर्ण केली आहेत. मात्र जून महिना अर्ध्याहून अधिक संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे.

मे महिन्यापासूनच ग्रामीण भागात खरीप हंगामाच्या तयारीला वेग येतो. यावर्षीही हवामान विभागाच्या अंदाजावर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी शेतीची तयारी युद्धपातळीवर केली. अनेक ठिकाणी भातशेतीसाठी आवश्यक असलेली मशागत पूर्ण झाली असून काही शेतकऱ्यांनी रोपवाटिकांचीही तयारी केली आहे. मात्र अपेक्षित पाऊस न झाल्याने पुढील शेतीकामे रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरवर्षी मे महिन्याच्या अखेरीस किंवा जूनच्या सुरुवातीला मान्सूनपूर्व सरींचे आगमन होऊन वातावरणात गारवा निर्माण होतो. त्यामुळे पेरणीसाठी पोषक परिस्थिती तयार होते. यंदा मात्र परिस्थिती वेगळी दिसून येत आहे. जून महिन्यातही उन्हाची तीव्रता कायम असून नागरिकांसह शेतकऱ्यांनाही उकाड्याचा सामना करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून आकाश ढगाळ असले तरी पावसाची अपेक्षित सर बरसत नसल्याने शेतकरी वर्गात नाराजीचे वातावरण आहे. पेण तालुक्यातील बहुतांश भागात शेती ही पूर्णतः पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाच्या आगमनाला विलंब झाल्यास भात लागवडीच्या वेळापत्रकावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही भागात विहिरी, तलाव आणि जलसाठ्यांमध्ये अद्याप पाणी उपलब्ध असले तरी खरीप हंगामासाठी भरपूर आणि नियमित पावसाची आवश्यकता आहे. मागील दोन वर्षांत निसर्गाने काही प्रमाणात साथ दिल्याने परिसरातील जलसाठ्यांमध्ये पाण्याची पातळी चांगली टिकून राहिली होती. जरी काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले, तरी भूजल पातळीत वाढ झाल्याने रब्बी हंगामाला त्याचा फायदा झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी नव्या उत्साहाने यंदाच्या खरीप हंगामाची तयारी केली. मात्र पावसाचे आगमन लांबल्याने शेतकऱ्यांच्या आशांवर विरजण पडण्याची भीती निर्माण झाली आहे. सध्या जिल्ह्यासह पेण तालुक्यात मशागतीची सुमारे ८० टक्के कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामेही अंतिम टप्प्यात आहेत. आता केवळ मान्सूनच्या दमदार आगमनाची प्रतीक्षा असून लवकरात लवकर चांगला पाऊस पडावा आणि खरीप हंगाम सुरळीत पार पडावा अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.



> रायगड जिल्ह्यातील ज्या भागात भात रोपवाटिकेची पेरणी पूर्ण झाली आहे, त्या ठिकाणी रोपवाटिकेच्या वाढीच्या कालावधीत कमी पाऊस अथवा पावसाचा खंड पडल्यास शेतकऱ्यांनी घाबरून न जाता पर्जन्यमान व जमिनीतील उपलब्ध ओलावा लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार नदी, नाले, विहिरी, शेततळे किंवा इतर उपलब्ध जलस्रोतांचा वापर करून संरक्षक सिंचन द्यावे. तसेच सिंचन देण्यापूर्वी रोपवाटिकेतील तणांचे वेळेवर नियंत्रण करणे आवश्यक आहे. हवामानातील बदल लक्षात घेता कृषी विभागाच्या सूचनांचे पालन करून शेतीचे नियोजन करावे. जिल्ह्यात खरीप हंगामासाठी आवश्यक तयारी करण्यात आली असून शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता कृषी विभागाशी संपर्क साधावा.
>
> **- प्रविण थिगळे (जिल्हा कृषी उपसंचालक, रायगड)**

# खापरखेडा व्यापारी संघटनेची बैठक संपन्न !

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** खापरखेडा, दहेगाव आणि भानेगाव या तिन्ही गावांतील व्यापाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष दिलीप जैन यांच्या अध्यक्षतेखाली राम मंदिर येथे उत्साहात संपन्न झाली. बैठकीत तिन्ही गावांतील व्यापाऱ्यांनी अभूतपूर्व एकता दाखवत आगामी काळातील कायदेशीर व व्यापारी व्यवस्था समजून घेऊन आपला व्यवसाय वाढवण्याचा निर्धार केला. व्यापारी संघटनेच्या वतीने यासंदर्भात महत्त्वपूर्ण प्रस्ताव मंजूर करण्यात आले. बैठकीत प्रामुख्याने अन्न व औषध प्रशासन विभागाकडून व्यापाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईवर चर्चा झाली. शासकीय नियमांचा आदर करत सर्व व्यापाऱ्यांनी



प्रशासनाच्या न्याय, नियमांचे काटेकोर पालन करूनच आपले व्यवसाय चालवावेत असा महत्त्वपूर्ण सल्ला व ठराव या बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला.

व्यापाऱ्यांसमोर सध्या सर्वात मोठी अडचण वाहतुकीची आहे. नागपूरहून किराणा हार्डवेअर व इतर माल वाहून आणणारे गॅरेज ट्रक गावाच्या आत येऊ शकत नाहीत. त्यामुळे व्यापाऱ्यांना मुख्य रस्त्यावरूनच दुकानांपर्यंत माल वाहून न्यावा लागतो. मात्र, अशा वेळी वाहतूक पोलिसांकडून व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी मालवाहू गाड्यांना रस्त्यावरून माल उतरवण्याची व वाहतुकीची रीतसर परवानगी मिळावी, अशी मागणी करणारे निवेदन प्रशासनाला देण्याचा प्रस्ताव व्यापाऱ्यांनी एकमताने मंजूर केला.

सदर बैठकीला तिन्ही गावांतील प्रतिष्ठित व्यापाऱ्यांची लक्षणीय उपस्थिती होती. यामध्ये मनोज चौरागडे, जैनदास जैन, केकेश्वर बोरकर, खुर्शीद अहमद, रवींद्र टापरे, श्रीधर बोडे, देवेंद्र टाले, निखिल भुरकुंडे, सचिन बांगुडकर, देवा कुकरेजा, हरीश खुराना, शिशुपाल रामटेके, गिरधारी शर्मा, जगदीश कुंभारे, दुगाने, नंदू डांगरे, जुनैद खान, बबलू सोनटक्के, संजय चौधरी, नकुल महल्ले, रजत फुतरिया, अतुल तीर्थकर, दीपक शाहू, जितेंद्र महाजन, गणेश तांडेकर यांच्यासह अनेक व्यापारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# महाबळेश्वर बदनामीचा कट? 'नवीन महाबळेश्वर'ला चमकवण्यासाठी - नगराध्यक्ष शिंदे

अक्षराज : रियाज मुजावर

दि.१८, महाबळेश्वर (सातारा) : महाबळेश्वरच्या पर्यटन व्यवसायाला आणि शहराच्या प्रतिमेला जाणीवपूर्वक धक्का देण्याचा एक मोठा कट रचला जात असल्याचा गंभीर आरोप महाबळेश्वरचे नगराध्यक्ष सुनील शिंदे यांनी केला आहे. सोशल मीडियाचा गैरवापर करून किरकोळ घटनांना अतिरंजित स्वरूप देत संपूर्ण महाबळेश्वरची बदनामी केली जात असल्याचा आरोप करत त्यांनी या प्रकरणामागील छुप्या शक्तींचा शोध घेण्याची मागणी केली आहे.



नगराध्यक्ष शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केला की, महाबळेश्वरमध्ये वाहतूक, पार्किंग, टोल किंवा पर्यटकांशी संबंधित किरकोळ समस्या यापूर्वीही होत्या आणि सोशल मीडिया देखील अस्तित्वात होता. मग गेल्या १ - २ वर्षांत अचानक म हाबळेश्वरविरोधी नकारात्मक प्रचाराचे प्रमाण एवढे वाढले कसे? यामागे नेमका कोणाचा अजेंडा काम करत आहे, याचा शोध घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यावेळी त्यांनी अत्यंत खोचक सवाल उपस्थित करत, जुन्या महाबळेश्वर ची प्रतिमा मलिन करून 'नवीन महाबळेश्वर' प्रकल्पाला लोकप्रिय करण्याचा प्रयत्न सुरू आहे का? असा प्रश्न विचारला. आधीच महाबळेश्वर आणि क्षेत्र म हाबळेश्वर अशी दोन स्वतंत्र ओळख असताना तिसऱ्या प्रकल्पाला पुन्हा 'नवीन महाबळेश्वर' हे नाव देण्यामागचा हेतू काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

महाबळेश्वर शहरातील अनेक मूलभूत समस्या आजही कायम असताना, रस्ते, पार्किंग, पाणीपुरवठा आणि पर्यटन सुविधांसाठी निधीची गरज असताना कोट्यवधी रुपयांचा निधी नवीन प्रकल्पाकडे वळवला जात असल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली. जुन्या महाबळेश्वरच्या विकासाकडे दुर्लक्ष करून नवीन प्रकल्पाला प्राधान्य का दिले जात आहे? असा थेट सवाल त्यांनी शासन आणि संबंधित यंत्रणांना केला.

दरम्यान, काही पर्यटकांशी झालेल्या किरकोळ वादांच्या घटना, टोलनाक्यांवरील तक्रारी किंवा स्थानिक प्रश्नांचे व्हिडिओ सोशल मीडियावर म ोठ्या प्रमाणावर व्हायरल करून 'बॉयकॉट महाबळेश्वर' सारखे ट्रेंड निर्माण केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. काही व्यक्ती किंवा गट संपूर्ण शहराची प्रतिमा खराब करण्यासाठी योजनाबद्ध पद्धतीने नकारात्मक वातावरण निर्माण करत असल्याची शंका त्यांनी व्यक्त केली.

नगराध्यक्ष सुनील शिंदे यांनी महाबळेश्वरकर, व्यापारी, हॉटेल व्यावसायिक आणि पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. महाबळेश्वर हे केवळ पर्यटनस्थळ नाही, तर हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. शहराची बदनामी करणाऱ्या कोणत्याही कटाविरुद्ध एकजुटीने उभे राहणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले.

महाबळेश्वर बदनाम करून 'नवीन महाबळेश्वर'ला चमकवण्याचा डाव कोणाचा?

सोशल मीडियावर सतत व्हायरल होणाऱ्या नकारात्मक मोहिमांचा सूत्रधार कोण?

जुन्या महाबळेश्वरच्या विकासाला डावलून नवीन प्रकल्पांना प्राधान्य का?

पर्यटन राजधानीची प्रतिमा मलिन करण्यामागे आर्थिक आणि राजकीय स्वार्थ दडले आहेत का?


महाबळेश्वरचे नाव वापरून नवीन ब्रँड उभा करण्यासाठी जुन्या शहराची प्रतिमा जाणीवपूर्वक खराब केली जात आहे का?

महाबळेश्वरच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे; शहराची बदनामी नव्हे तर सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे हेच सर्वांचे कर्तव्य आहे, असे आवाहन नगराध्यक्ष सुनील शिंदे यांनी केले.

# पावसाळ्यापूर्वी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामाला सुरुवात; डायघरपासून कामाला प्रारंभ

अक्षराज : विनोद वास्कर

दि.१८, डायघर (ठाणे) : पावसाळ्यापूर्वी नागरिकांना रस्त्यावरील खड्ड्यांचा त्रास होऊ नये. यासाठी ठाणे महापालिकेच्या प्रभाग क्र.२९ मध्ये डांबरीकरण करून खड्डे बुजवण्याच्या व दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली आहे. नगरसेवक बाबाजी पाटील यांच्या मागणीला यश आले असून, डायघर गावापासून या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.





## नगरसेवक बाबाजी पाटील यांच्या मागणीला यश

**या गावांमधील रस्ते होणार खड्डेमुक्त :**

नगरसेवक बाबाजी पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, डायघर सोबतच शिळ, पडले, खिडकाळी, देसाई, फडकेपाडा, खार्डी या सर्व गावांम धील रस्त्यावरील खड्डे डांबरीकरण करून दुरुस्त करण्यात येणार आहेत. पावसाळ्यात खड्ड्यांमुळे वाहनचालकांना होणारे अपघात आणि नागरिकांना होणारा त्रास यातून मुक्तता मिळणार आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मागणी :**

ही मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे व आम दार राजेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नेतृत्वाखाली करण्यात आली होती. त्यांच्या सूचनेनुसार पावसाळ्यापूर्वीची कामे तातडीने हाती घेण्यात आली आहेत.

पावसाळ्यात नागरिकांचे हाल होऊ नयेत. म्हणून खड्डे बुजवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. प्रभागातील एकही रस्ता खड्डेयुक्त राहणार नाही याची काळजी घेत आहोत, असे नगरसेवक बाबाजी पाटील यांनी सांगितले.

**तिन्ही नगरसेवक सज्ज :**

प्रभाग क्रमांक २९ च्या नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांना सर्व मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील आणि नगरसेविका वेदिका पाटील हे तिन्ही लोकप्रतिनिधी सदैव तत्पर आहेत. नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी हे तिन्ही नगरसेवक सातत्याने प्रयत्नशील असून, विकास कामाचा पाठपुरावा करत आहेत.

# कर्जत रेल्वे स्थानकावर 'जीवन रक्षा अभियान'; रेल्वे लाईन क्रॉसिंग टाळण्याचे पोलीसांचे आवाहन

अक्षराज : जयेश जाधव

दि.१८, कर्जत (रायगड) : रेल्वे रुळ ओलांडताना होणारे अपघात, अपमृत्यू आणि जखमींच्या घटनांना आळा घालण्यासाठी कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने दि.१७ जून २०२६ रोजी कर्जत रेल्वे स्थानकावर 'जीवन रक्षा अभियान' अंतर्गत व्यापक जनजागृती म ोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेद्वारे रेल्वे प्रवाशांना सुरक्षित प्रवासाचे म हत्त्व पटवून देत वाहतूक आणि रेल्वे सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. मुंबई लोहम ार्ग पोलीस आयुक्त यांच्या आदेशानुसार सकाळी ९ ते ११ या वेळेत कर्जत रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक १ व २ वर, सीएसएमटी आणि पुणे बाजूच्या परिसरात ही विशेष मोहीम आयोजित करण्यात आली होती. अनेक रेल्वे प्रवासी लोकल पकडण्याच्या घाईत रुळ ओलांडून जीव धोक्यात घालत असल्याचे निदर्शनास आल्याने ही मोहीम हाती घेण्यात आली. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मानवी साखळी निम ाण करून रेल्वे प्रवाशांना सुरक्षेचे धडे दिले. मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक देविदास वाल्मिकी, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण कड, आनंद लोखंडे, सूर्यकांत देसाई, सतीश व्हर्गे, पोलीस हवालदार राजेंद्र बागुल, आरपीएफ सब इन्स्पेक्टर सुहासिनी लादे यांच्यासह ३२ पोलीस अंमलदार, १ आरपीएफ जवान, २ एमएसएफ कर्मचारी, २० होमगार्ड, अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेचे ३ शिक्षक व ३० एनसीसी आणि आरएसपी विद्यार्थी तसेच कर्जत प्रवासी संघटनेचे उपाध्यक्ष शिवसेवक गुप्ता, भारती ताई कांबळे आदी होते. सदस्य सहभागी झाले यावेळी प्रवाशांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध घोषणा देण्यात आल्या.




अवाजवी धाडस टाळा, जीवन अनमोल आहे, लाईन क्रॉसिंग करू नका, घरी कोणीतरी आपली वाट पाहत आहे, रेल्वेचे नियम पाळा, अपघात टाळा, धावती लोकल थांबत नाही, तुम्ही थांबा, वेळ वाचविण्यासाठी आयुष्य घालवू नका अशा प्रभावी संदेशांद्वारे प्रवाशांना सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच रेल्वे प्रवासादरम्यान कोणतीही अडचण निर्माण झाल्यास जीआरपी हेल्पलाईन क्रमांक १५१२ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. धावत्या रेल्वेत स्टंटबाजी न करण्याचा, संशयास्पद वस्तूंना हात न लावण्याचा आणि तत्काळ रेल्वे पोलिसांना माहिती देण्याचा सल्ला ही देण्यात आला. या उपक्रम ात सहभागी विद्यार्थ्यांनी ही प्रवाशांना सुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यामुळे रेल्वे सुरक्षा आणि अपघात प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यास म ोठी मदत झाली. या मोहिमेमुळे रेल्वे प्रवाशांमध्ये रेल्वे पोलिसांविषयी सकारात्मक भावना निर्माण झाली असून सुरक्षित प्रवासासाठी नियमांचे पालन संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात यश करण्याचा आले.

# पालम शहरात एकाच रात्री चोरट्यांनी तीन दुकाने फोडले

अक्षराज : प्रतिनिधी

दि.१८, पालम (परभणी) : शहरात चोरट्यांनी एकाच रात्री तीन ठिकाणी दुकाने फोडून धुमाकूळ घातल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निम ाण झाले आहे. पोलिसांची गस्त सुरू असतानाही चोरट्यांनी मोठ्या शिताफीने चोरी केल्याने पोलिस यंत्रणेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

गंगाखेड रोडवरील मयुरी बार येथे मध्यरात्री सुमारे ३ ते ३:१५ वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी बारच्या पाठीमागील शटर व खिडकी वाकवून आत प्रवेश केला. चोरट्यांनी तेथून काही रोख रक्कम रुपये व सुमारे २ हजार रुपयांची दारू लंपास केली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून त्यामध्ये चेहऱ्यावर रुमाल बांधलेले दोन चोरटे चोरी करताना स्पष्ट दिसत आहेत.

मयुरी बारचे मालक झोटींग पाटील यांना चोरीची घटना मोबाईल वर कळताच त्यांनी पालम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आदित्य लोणीकर यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळाल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांत पोलीस निरीक्षक लोणीकर घटनास्थळी दाखल झाले, तोपर्यंत चोरटे पसार झाले होते. याच रात्री तहसील कार्यालयासम ोरील आवारातील विशाल भोसले यांच्या भोसले मल्टीसर्वीसेस या दुकानाचे शटर वाकवून चोरट्यांनी आत प्रवेश केला व तेथील ही आत गल्यात असलेली रोख रक्कम चोरून नेली.

तिसऱ्या घटनेत लोहा रोडवरील एका देशी दारू दुकानाचे शटर वाकवून मध्यरात्री अंदाजे २ ते ३ वाजे दरम्यान चोरट्यांनी दुकानातील काही रोख रक्कम तसेच काही देशी दारूच्या बाटल्या लंपास केल्या. विशेष म्हणजे रात्रभर पोलिसांची गस्त शहरात सुरू असतानाही चोरट्यांनी केलेल्या या धाडसी कृत्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

दरम्यान, चोरीचा छडा लावण्यासाठी घटनास्थळी फिंगरप्रिंट तज्ञ आणि डॉग स्कॉड पाचारण करण्यात आले असून पालम पोलीस चोरट्यांचा कसून शोध घेत आहेत.

## थोडक्यात

# २ वर्षापासून सुरु असलेला समाजातील वाद मिटला

अक्षराज : अलीम शेख



दि.१८, चारठाणा (परभणी) : समाजामध्ये भांडण झालेली केसला आज रोजी अँड. सय्यद. वाय.ए.अंतुले यांनी दोन समाजातील वाद मिटवून निकाली काढण्यात आले न्यायालयात कायद्याची लढाई जिंकणारे अनेक असतात, परंतु कोर्टाबाहेर दोन समाजांतील तुटलेली मने जोडून 'माणुसकी आणि शांततेची' लढाई जिंकणारे तुमच्यासारखे दुर्मिळ असतात. आमच्या गावातील दोन धर्मांमधील कायदेशीर वाद सामोपचाराने मिटवून, केस पूर्णपणे 'नील' करण्यात आपण जी महत्त्वाची भूमिका बजावली, त्याबद्दल संपूर्ण गावाच्या वतीने आपले आभार. आपण केवळ केस संपवली नाही, तर दोन समाजांमध्ये आपुलकी, विश्वास आणि संगमताचे एक नवे पर्व सुरू केले आहे. दोन्ही बाजूंचे गैरसमज दूर करून, गावाला वादमुक्त आणि एकसंध ठेवण्याचे आपले हे प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहेत. कागदावरील वाद मिटवून सम ाजात शांततेची प्रेरणा करणाऱ्या आपल्या या सामाजिक बांधिलकीला आमचा सलाम.तुमच्या या समजूतदार आणि सकारात्मक प्रयत्नांमुळे आमच्या गावाला एकतेचा नवा मार्ग मिळाला आहे. कागदावरचा वाद संपवून समाजात शांततेची प्रेरणा करणाऱ्या आपल्या या अतुलनीय कार्याला संपूर्ण गावाचा सलाम! आम्ही सर्व ग्रामस्थ आपले आयुष्यभर ऋणी राहू.

# मॉर्निंग वॉकला गेलेल्या ६५ वर्षीय वृद्धेचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू

अक्षराज : दिवाकर घेर



दि.१८, नागपूर : मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या एका ६५ वर्षीय वृद्ध म हिलेला भरधाव अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याची घटना खापरखेडा कोराडी देवी मंदिर मार्गावर १८ जून गुरुवारला पहाटेच्या सुमारास घडली. या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला त्यामुळे खापरखेडा परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. जिजाबाई कृष्णाजी गौरखेडे वय ६५, रा.भिमनगर, वार्ड क्र.४, चर्चजवळ खापरखेडा असे मृत महिलेचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार जिजाबाई गौरखेडे ह्या गुरुवारी पहाटे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी खापरखेडा-कोराडी देवी मंदिर मार्गावरून जात होत्या. यादरम्यान पहाटे ५:४५ वाजताच्या सुमारास त्या ए.पी.बिअर बार समोर मागून आलेल्या एका भरधाव अज्ञात वाहनाने पाठीमागून जोरदार धडक दिली.

सदर धडकेत जिजाबाई रस्त्यावर पडल्या, यावेळी त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. मात्र जिजाबाईला रक्ताच्या थारोळ्यात बघून चालक वाहनासह घटनास्थळावरून फरार झाला.

घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हरीष रूमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी प्रकाश जवादे व त्यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या जिजाबाईंना पोलिसांनी तातडीने नागपूर येथील मेयो रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांच्यावर शर्थीचे उपचार केले मात्र अखेर सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. खापरखेडा पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून परिसरातील रस्त्यांवरील सीसीटीव्ही फुटेजचा शोध घेतल्या जात आहे. या दुर्दैवी घटनेमुळे भिमनगर खापरखेडा परिसरात शोककळा पसरली असून जिजाबाई गौरखेडे यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

# ४ वर्षांपासून 'हर घर जल' चे स्वप्न अधांतरी; योजनेची चौकशी व्हावी - रवीश रासकर



अक्षराज : वसंत रांधवण

दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) : केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी 'हर घर जल' संकल्पनेतून प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे शुद्ध पाणी पोहोचविण्याचा उद्देश असला, तरी तालुक्यातील वाघुंडे बुद्रुक येथील ग्रामस्थांना या जलजीवन योजनेचा लाभ मिळालेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ८ जून २०२२ रोजी हि योजना चालू झाली. जलजीवन योजना पूर्ण होण्याची तारीख ८ जून २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असलेली ही योजना ४ वर्षे उलटून ही अपूर्ण असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या योजनेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत सखोल चौकशी व आर्थिक ऑडिट करण्याची मागणी काँग्रेस कामगार सेनेचे तालुकाध्यक्ष रवीश रासकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले, ग्रामपंचायतने प्रत्येकाकडून डिपॉजिट म्हणून २ हजार रुपये घेतले. मात्र ४ वर्ष होऊन गेले, अद्याप हर घर पाणी आलेच नाही. सध्या दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून गावात २ ते ३ महिन्यापासून सर्व ग्रामस्थ टँकरने पाणी विकत घेतात.

गावातील प्रत्येक कुटुंब पाणीपट्टी भरते, मग ग्रामपंचायतीकडून पाणी का भेटत नाही? वाघुंडे बुद्रुक गावात जी जलजीवन योजना झाली. तिची चौकशी करून ऑडिट व्हावे. त्या संबंधित जे ठेकेदार अधिकारी आहेत. त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी कामगार सेनेचे तालुकाध्यक्ष रासकर यांनी केली. जलजीवन योजनेचा लाभ लवकरात लवकर गावातील प्रत्येक कुटुंबाला मिळावा.

१० दिवसात योग्य ऑडिट करून गावातील प्रत्येकाला योजनेचा लाभ मिळाला नाही तर जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे पत्रव्यवहार करून बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल,असा इशारा रवीश रासकर यांनी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाल निवेदनाद्वारे दिला.